नि.फौ.प्र.क्र. ९९/२०२५
शा. वि.. गणेश व इतर
**नि.क्र.११**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव – बालाजी विठ्ठलराव उडतेवार,
वय वर्षे – ५८ वर्षे, व्यवसाय –नोकरी,
हा.मु. रा.विश्वशांतधाम मंदीराच्या मागे चाकूर ता. चाकुर जि. लातूर

**सरकारतर्फे शपथेवर सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री. आर.जी. गिरी यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. दि. १०.०७.२०२४ ते १२.०७.२०२४ या दरम्यान माझे चाकुर येथील रहात्या घरी चोरी झाली होती. दि.११.०७.२०२४ रोजी माझ्या मेव्हण्याच्या मुलाचे लग्न होते म्हणून आम्ही घरातील सर्वजण उदगीर येथे दि.१०.०७.२०२४ रोजी गेलो होतो. दि.१२.०७.२०२४ रोजी सकाळी ०८.३० वा. मी चाकुर येथील घरी आलो. तेंव्हा मला दिसले की, माझ्या घराच्या मुख्य दरवाज्याची कडी कोंडा, कुलूप तोडलेले होते. मी घरामध्ये प्रवेश केला तेव्हा मला दिसले की, सगळे कपडे अस्ताव्यस्त पडलेले आहेत. घरातील बेडरुममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला. मी लॉकरमध्ये असलेले सोने आहे किंवा नाही याची खात्री केली तेंव्हा मला समजले की, माझे एक तोळ्याचे सोन्याचे लॉकेट, पांढरा खडा असलेली दिड ग्रॅम सोन्याची अंगठी आणि माझ्या मुलीचे दिड ग्रॅम सोन्याची अंगठी आणि पाच ग्रॅमचे सोन्याचे कानातले फुल जोडी, तेथे आढळून आले नाहीत. मला चोरी झाल्याची खात्री झाली. त्यानंतर मी सदर घटनेची माहीती माझ्या पत्नीला आणि माझ्या शेजारी विशाल महाजन आणि संजय भोसले यांना दिली. त्यानंतर मी चाकुर पोलीस ठाण्यात माझ्या घरात चोरी झाल्याची अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दाखल केली. आता मला

नि.क्र.११

दि. १२.०७.२०२४ रोजीची ती तक्रार दाखविण्यात आली, त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र. P1/PW1 देण्यात येते.

२. त्यानंतर कांही दिवसांनी दि. १२.१०.२०२४ रोजी पोलीस ठाण्यामध्ये मला बोलाविले. तेथे पोलीसांनी मला सांगितले की, तुमच्या घरात चोरी झालेले सामान गगण्या अंजीर पवार, अमोल भोसले, जे–या उर्फ जरु भोसले यांच्याकडे सापडले. पोलीसांनी मला सांगितले की, आरोपींकडून त्यांनी एक तोळा सोन्याचे लॉकेट आणि दिड ग्रॅम पांढरा खडा असलेली अंगठी जप्त केलेली आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. एन.आर. केराळे यांच्या मार्फत.**

३. चोरी किती वाजता झाली हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरात चोरी कोणी केले हे मला समजले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरी चोरी झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

माझे समक्ष श्रवणोत्तर स्वीकृत

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2025.12.18 14:55:05 +0530

(श्रीमती दि.सा. करभाजन)

दिनांकः १८/१२/२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग चाकुर,
न्यायालय क्र.२.